
नेल्ली ब्लाय म्हणते

“काहीच अशक्य नसतं”

लेखिका:

ज्युडी कार्लसन



चित्रे:

माइक इगल

नेल्ली ब्लाय म्हणते

“काहीच अशक्य नसतं”

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन

ई.स. 1885 मध्ये काही लोक मानत की स्त्रियांना नोकरी, कामधंदा वगैरे करणे जमणार नाही. पण नेल्ली ब्लाय म्हणे, “काहीच अशक्य नसतं.”

नेल्ली तेव्हा 17 वर्षांची होती. तिने वृत्तपत्रात एक लेख वाचला होता. त्याचे शीर्षक होते, “मुलींना काय जमू शकते?” त्या लेखात लिहिले होते की स्त्रियांना घराबाहेरची कामे करणे जमू शकत नाही. नेल्लीला त्या लेखात मांडलेली मते आवडली नाहीत. तिने त्या वृत्तपत्राला पत्र लिहिले आणि आपली प्रतिक्रिया कळवली. तिचे लिखाण इतके छान होते की वृत्तपत्राने तिला नोकरीवरच ठेवले.



नेल्ली त्या वृत्तपत्रात एक बातमीदार म्हणून काम करू लागली. आपल्या डोळ्यांनी बघितलेल्या तसेच लोकांनी कथन केलेल्या घटनांबद्दल ती वृत्तपत्रात लिहू लागली.


नेल्ली आपले काम चांगल्याप्रकारे करत होती. ती जागोजागी फिरत असे. यात नव्या लोकांच्या भेटीगाठी होत, नव्या गोष्टी पाहायला मिळत. हे सर्व तिला आवडत असे. जे काही बघायला मिळत असे, ऐकायला मिळत असे त्याबद्दल ती लिहीत असे. नेल्लीचे लेख वाचायला लोकांना आवडत असे.





ई.स. 1888 मध्ये ती न्यूयॉर्क शहरातील वृत्तपत्र *द वर्ल्ड* येथे बातमीदार म्हणून काम करू लागली.

एके दिवशी, नेल्लीने वृत्तपत्राचे मालक *जॉन कॉकरिल* यांना *अराऊंड द वर्ल्ड इन एटी डेज (80 दिवसांत जगभ्रमंती)* या पुस्तकाबद्दल सांगितले. तिने ते पुस्तक वाचले होते. त्याकाळी, खरंच अशी जगभ्रमंती कुणी करू शकेल, यावर कुणाचा विश्वास नव्हता. पण नेल्लीला असा प्रयत्न करून पाहायची इच्छा होती.



ई.स . 1888 मध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास फार वेळ लागत असे. त्याकाळी विमाने नव्हती. समुद्र ओलांडायला जहाजातून अनेक दिवस प्रवास करावा लागत असे.

जमिनीवर प्रवास करण्यासाठी लोक रेल्वेगाडीतून जात. पण त्याकाळातील रेल्वेगाड्या आजच्याइतक्या वेगाने धावत नसत. एखाद्या ठिकाणी रेल्वेगाडीने पोहोचण्यासाठी कधीकधी खूप दिवस लागत.

त्यामुळे ऐंशी दिवसांत संपूर्ण जगाची भ्रमंती ही गोष्ट अशक्य वाटत होती.







सुरुवातीला श्री. कॉकरिल यांचा नेल्लीच्या या कल्पनेला नकार होता. ती हा प्रवास पूर्ण करू शकेल अशी खात्री त्यांना वाटत नव्हती. पण अखेरीस त्यांनी तिचा प्रस्ताव मान्य केला.

आपल्यासोबत नेल्लीने फक्त एका बॅगेइतकेच सामान घेतले. एका रेल्वेगाडीतून दुसऱ्या रेल्वेगाडीत जाताना एकच बॅग नेणे सोपे पडले असते

14 नोव्हेंबर 1889 रोजी सकाळी 9:40 वाजता, नेल्ली न्यू जर्सी शहरात एका जहाजात बसली आणि जगभ्रमंती करण्याचा तिचा प्रवास एकदाचा सुरू झाला.






अनेक आठवड्यांच्या प्रवासानंतर नेल्ली इंग्लंडला पोहोचली. तिथे तिची भेट एका बातमीदाराशी झाली. तो द वर्ल्ड या वृत्तपत्रासाठीच काम करत होता.

बातमीदाराने नेल्लीला विचारले की युरोपात तिला काय पाहायला आवडेल. तिने एका व्यक्तिला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. त्या व्यक्तिनेच *अराऊंड द वर्ल्ड इन एटी डेज* हे पुस्तक लिहिले होते. त्या व्यक्तिचे नाव होते, *ज्यूल्स वर्न*.






“ज्यूल्स वर्नला भेटायचंय?” बातमीदाराने विचारले. “अशक्य. तुझ्याकडे इतका वेळ नाहीये!”

“काहीच अशक्य नसतं,” नेल्ली म्हणाली.

ज्यूल्स वर्नला भेटायला नेल्लीला दोन दिवसांचा रेल्वेप्रवास करावा लागला. प्रवासात तिला झोपायलाही वेळ मिळाला नाही. पण शेवटी ती फ्रान्सला ज्यूल्स वर्नच्या घरी पोहोचली.




नेल्लीला ज्यूल्सशी गप्पा मारण्याची संधी मिळाली. त्यांनी *अराऊंड द वर्ल्ड इन एटी डेज* हे पुस्तक ज्या जागी बसून लिहिले, ती जागाही तिने पाहिली.

पण नेल्लीकडे फार वेळ नव्हता.

“शुभेच्छा, नेल्ली,” ज्यूल्स वर्न म्हणाले. “आशा आहे की तू ऐंशी दिवसांपेक्षाही कमी दिवसांमध्ये जगभ्रमंती पूर्ण करशील.”

नेल्लीलाही आशा होती. पण ज्यूल्स वर्नला भेटण्यात तिचे दोन दिवस खर्च झाले होते. ती वेळेत आपला प्रवास पूर्ण करू शकेल? वेळेत घरी परतू शकेल?



हाँगकाँगपर्यंतच्या प्रवासात नेल्लीचा वेळ चांगला गेला. पण तिथे पोहोचल्यावर एका व्यक्तिने तिला सांगितले की दुसरी एक बातमीदार *एलिझाबेथ बायलंड*सुद्धा जगभ्रमंती करायला निघाली होती.


बायलंडला नेल्लीपेक्षा कमी वेळात जगभ्रमंती करायची होती. काही दिवसांपूर्वीच तिने हाँगकाँगमधून आपला प्रवास सुरू केला होता. त्या व्यक्तिने सांगितले की नेल्लीला बायलंडआधी प्रवास पूर्ण करणे अशक्य होते.



“काहीच अशक्य नसतं,” नेल्ली उत्तरली. पण आता तिलाही विश्वास वाटत नव्हता. आपण बायलंडच्या अगोदर घर पोहोचू?

नेल्लीने हार मानली नाही. प्रशांत महासागर ओलांडण्यासाठी ती एका जहाजात बसली. शेवटी अनेक आठवड्यांनंतर ती सॅनफ्रान्सिस्कोला उतरली.

सॅनफ्रान्सिस्कोमध्ये ती न्यू जर्सीला जाणाऱ्या एका रेल्वेगाडीत चढली. आपला प्रवास जलद गतीने पूर्ण होईल अशी आशा तिला वाटत होती. घरी पोहोचण्यासाठी ती उतावीळ झाली होती.






न्यू जर्सीला पोहोचता पोहोचता रेल्वेगाडी अनेक ठिकाणी थांबली. प्रत्येक स्टेशनवर लोक नेल्लीला भेटायला आले. ती जगभ्रमंती करत आहे, हे त्यांनी वृत्तपत्रातून वाचले होते. तिला यात यश मिळो, अशी शुभेच्छा सर्वांना व्यक्त करायची होती.

एका स्टेशनवर एक माणूस तिच्याकडे पाहून ओरडला, "तुम्ही माझ्याशी हात मिळवायलाच हवा!" नेल्लीने त्याच्याशी हात मिळवला तेव्हा तो हसून म्हणाला, "माझ्या हातात भाग्य आहे. तुमचं भाग्य नक्की उजळणार!"





खरोखरच, नेल्लीचं भाग्य उजळलं. न्यू जर्सीपर्यंत तिचा प्रवास जलदगतीने झाला.

शेवटच्या स्टेशनच्या आधी श्री. कॉकरिल ट्रेनमध्ये आले. त्यांनी नेल्लीला सांगितले की बायलंडचा प्रवास अद्याप पूर्ण झालेला नाही. नेल्ली तिच्याआधीच घरी पोहोचली होती. मग त्यांनी नेल्लीला म्हटले की तिने पुढल्या स्टेशनवर उतरावे. त्याच स्टेशनवर तिने आपला प्रवास सुरू केला होता.



ट्रेनने शेवटच्या स्टेशनमध्ये प्रवेश केला. नेल्लीने बाहेर बघितले. स्टेशनवर लोकांची गर्दी जमली होती. ते सगळे नेल्लीचीच वाट बघत होते.

नेल्ली आनंदाने हसली. प्लॅटफॉर्मवर उडी मारून उतरताच श्री. कॉकरिल यांनी आपल्या घड्याळात पाहिले. तो दिवस होता, 25 जानेवारी 1890 आणि वेळ होती, दुपारी 3:31. नेल्लीने 72 दिवसांपेक्षा थोड्याशा जास्त वेळात संपूर्ण जगाची भ्रमंती पूर्ण करण्यात यश मिळवले होते.

“मी करून दाखवलं!” नेल्ली ओरडली. “काहीच अशक्य नसतं. शेवटी एकदाची मी घरी पोहोचले. मला खूप आनंद झालाय.”





नेल्लीने आपल्या प्रवासाचा सारा वृत्तांत लिहून काढला. तिने अनेक कथा-कहाण्याही लिहिल्या. तिच्या कथा वाचून लोकांना आपणच नवनव्या ठिकाणी प्रवास करत आहोत, नवनवी दृश्ये पाहात आहोत असे वाटू लागले. नेल्लीने त्यांना जगाचे दर्शन करवले आणि काहीच अशक्य नसतं हे सिद्ध केले.



